
कृष्णा पाटील

# कामगारांच्या कविता



१९८७५
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २२८९

REFBK-0021372
REFBK-0021372

२१३६२
संदर्भशाखा
१०/११/७६
काव्य

# कामगाराच्या कविता

कृष्णा पाटील

काव्य
२१३६२
दि. २२/७
REFBK-0021372

◎ मनीषा प्रकाशन | तांबेपुरा, अमळनेर, जि. जळगाव | मूल्य रु. ६ ◎

मनीषा प्रकाशन | मनीषा प्रकाशन | मनीषा प्रकाशन

● प्रकाशिका
सौ. कल्पना कृष्णा पाटील
तांबेपुरा, अमळनेर, जि. जळगाव

● मुद्रक
नाना डेंगळे
साधना प्रेस
४३०-३१ शनिवार, पुणे ३०

● हक्क स्वाधीन | सौ. कल्पना कृष्णा पाटील

● मुखपृष्ठ | सुभाष अवचट
मांडणी | मधु पाटील

● प्रथमावृत्ती : ८ फेब्रुवारी १९७६



## प्रिय श्री. दाजीबा पाटील

साध्या कामगारापासून कामगार-नेतेपण आपणास लाभले, ते केवळ आपल्या कामगार-प्रेमामुळे. 'कामगार–जीवन' हेच सर्वस्व मानून आयुष्याची वाटचाल उत्कर्षाने साधणाऱ्या तुमच्यासाठी माझा हा चिमुकला मुजरा.

कृष्णा पाटील

## ◎ कवितेआधीचे दोन शब्द ◎

'कामगाराच्या कविता' हा काव्य-संग्रह प्रसिद्ध व्हावा अशी अनेक सहकाऱ्यांची व मित्रांची तळमळीची इच्छा होती. त्यांनी कळकळीने तत्परता दाखविल्यानेच आजचा दिवस उगवला. त्या अनुषंगाने माझे ज्येष्ठ स्नेही सर्वश्री प्रभाकर शुक्ल, डॉ. प्र. स. पंडित, रघुनाथ पाटील, लालचंद सोनवणे, यादवराव बोराडे, आर. जी. पाटील, यांचा उल्लेख कृतज्ञतापूर्वक करणे आवश्यक आहे.

प्रा. ल. के. कुळकर्णी, प्रा. ब. लु. सोनार व कविमित्र प्रा. राजा महाजन, वा. रा. सोनार, धों. वे. जोगी यांचा मी खास ऋणी आहे.

श्री. आबासाहेब नारायणराव पाटील, नामदेव सहादू पाटील यांनी माझ्या कवितेला मार्ग दाखविला. त्यांचे आभार मानावे तेवढे थोडेच.

'साधने'ने माझ्या संग्रहाची उत्कृष्ट छपाई करून संग्रह वेळेत दिल्याबद्दल सर्व साधना परिवाराचे आभार.

मुखपृष्ठासाठी श्री. सुभाष अवचट आणि लक्ष घालून मांडणी करणारे श्री. मधू पाटील यांचेही आभार.

कवितेबद्दल मी काय सांगणार ?<br>
हा पहिलाच संग्रह.<br>
वाचकांनी कामगार कल्पनेत रममाण व्हावे.<br>
आजचा शेवट उद्याची सुरुवात ठरावी.<br>
शेवटची ओळ असंख्य श्रमिकांसाठी

अमळनेर<br>
ता. ८-२-१९७६

— कृष्णा पाटील<br>
(खाचणेकर)

## प्रास्ताविक

# 'कामगाराच्या कविता'-निमित्ताने

प्रथमच नमूद करतो, की एखाद्या पुस्तकाला आणि त्यातल्या त्यात कविता-संग्रहासारख्या जोखमीच्या पुस्तकाला प्रस्तावना देण्याइतका मी अधिकारी नाही. ना कवितेत की समीक्षेत. असे असूनही मी हे दोन शब्द लिहायला प्रवृत्त झालो, ते 'कामगाराच्या कविता' या रोखठोक नावाने आपल्या कृती पेश करण्याची खूप हौस असलेल्या श्री. कृष्णा पाटील यांच्या स्नेहासाठी. स्नेहापोटी मग अनायसे बऱ्याच गोष्टी येतात. त्यात पाठीवर शाबासकीची थाप येते, न भावणाऱ्या गोष्टींकडे बघण्याचीही एक अनावश्यक स्निग्धता येते.

कृष्णा पाटील यांच्या संग्रहाच्या निमित्ताने मला एक दोन वैशिष्ट्ये जाणवली. एक तर कृष्णा पाटील हे खरेखुरे कामगार आहेत आणि आपल्या जगात राहूनही कविता-निमित्ताने ओठावर काही भावना शब्दांतून खेळवण्याची वृत्ती टिकवून आहेत. भावनांना शब्दरूप देण्याची प्रचंड हौस आहे-नव्हे निष्ठा आहे. आपल्या जगाच्या कोषाची त्यांना जाण आहे. आणि कित्येकदा ही जाण त्यांच्या आविष्काराची मर्यादाही आहे. अनुभवाकडे बघण्याची त्यांची एक 'कामगार-दृष्टी' आहे. भोवतालच्या जगात आपली वाट काढताना अनेक भूमिका कराव्या लागताहेत. या भूमिकाही इथे शब्दरूप घेत आहेत. कामगाराच्या जीवनाची, त्याच्या विशिष्ट अपेक्षित जगाची तोंडओळख थोड्याअधिक चढ्या आवाजात इथे आपल्याला होईल असे वाटू लागावे तोच कामगार-माणूस म्हणून अनुभवांचा पट इथे त्याच्या शब्दात उलगडताना दिसू लागतो. म्हणूनच एकाच वेळी तो कुटुंबातल्या नात्यातून व्यक्त होणाऱ्या आपल्या विश्वात साध्यासीध्या दृष्टीने बघताना याच जीवनाचे एक अंग म्हणून एखाद्या भाविकाच्या रूपातही तो दिसू लागतो. अशी सलग कविता वाचताना मग ती फक्त कामगाराची कविता उरत नाही. तर कामगार असलेला बाप, भाऊ, पती आणि भजनांचे सूर कवटाळीत एखादा भक्त

म्हणूनही नाना रूपे घेऊ लागते. असे विविध नात्यांनी कविता क्वचित् विकीर्ण अनुभवांची वाटूनही त्यात आंतरिक सुसंगतीचा एक धागा कुठेतरी हाती लागतो हे माझ्या दृष्टीने विशेष होय आणि अशा विविध अनुभवांतूनही पुन्हा त्याचे 'कामगार' हे मूलसूत्र कायम राहण्याची धडपड इथे कुठे कुठे दिसून येते.

'वाकूझरेस' या आपल्या कवितेत ते जेव्हा

'खट्याळसा शब्द जरी
टाकी बांध मधे तुला
दे धडक प्रकटनाची
ने, तोडुनी बांधाला'

अशी रचना करतात, तेव्हा मला काय सांगायचे आहे त्यास पुष्टी मिळते.

आपल्या इवल्या कुटुंबात जेव्हा ते 'इवलेसे कान । डोई वाढे रान । ऐटदार मान । पुनवेचा चान' असे साध्या शब्दांतून एक कोवळे शब्दचित्र सहज उभे करून जातात आणि केव्हा केव्हा

'शिशिराच्या गारव्यात
तुझी ऊब जाणवते
आणि निश्चल मेघात
तुझे पाऊल वाजते'

या ओळीतून आपल्या सुखदुःखाचे 'गूढ' सोडवताना त्याचा अर्थही लावण्याचा प्रयत्न करतात.

शेतकऱ्याच्या घरात जन्मलेला आणि कामगाराचं आयुष्य जगणारा हा कवी बघता बघता निसर्गातूनही सातपुड्याचा केवढा आधार मनाशी बाळगतो, हे

माझ्या गावाच्या शेजारी
गिरी थोर सातपुडा
पाठिराखा तो आमुचा
काय अम्हा तुटवडा

या ओळींतून दिसते.

एक उधळून द्यायला सदा तत्पर असा माणसातला निखालस भाव कवी जेव्हा प्रकट करतो तेव्हा हाच कवीतील माणूस सातपुड्याइतका तरी उंची गाठू बघतो.

फुटक्या या मडक्याने
जगी भरू दे की पाणी
शमवू दे तृष्णा त्यांची
जे रडती केविलवाणी

या ओळीतून व्यक्त होणारा भाव हा केवळ पारंपरिक श्रद्धाळू वृत्तीतून येणारा नाही, तर वास्तवाच्या भानातून यातली आर्त इच्छा अधिक देखणी होताना दिसते.

किंबहुना कृष्णा पाटील जेव्हा एक कामगार म्हणून जागे होतात, तेव्हा कदाचित् त्यांच्या कवितेतून एक अभिनिवेशी म्हणून काहीशी कृत्रिमतेकडे झुकणारी वृथा शब्दरचनेने भारलेली आणि काव्य हरवू पाहणारी कविताही इथे नाही असे नाही. 'मी एक कामगार आहे', 'कामगार मित्र', 'कामगाराचा संसार' या कविता याच्या साक्षी आहेत. एखादी भूमिका घेऊन आपली कविता वा कलाकृती राबविणाऱ्या कोणाही कवि-लेखकाचे व्हावे तसे या ठिकाणीही काही कृतींतून जाणवत राहते.

आपल्या अनुभवांना सीमित करून स्वतःला कुचंबून टाकण्याचा हा घाट बऱ्याचदा न परवडणारा असतो. त्यामुळेच पुष्कळदा यातल्या चित्रित सुखद अनुभवांनी आनंद लाभत नाही, की दुःखाच्या प्रकटनातून मनापर्यंत पोचण्याची शक्ती उरत नाही.

असे असूनही या कवितेतून एक धडपड जाणवते ती अनेकांगी अनुभवातून स्वतःला सोडून देण्याची. या कविता–संग्रहाने आशेची दाखवलेली एवढी किरण-शलाका. ती अजून खऱ्या अर्थाने कामगाराची कविता व्हायची आहे. पण ते सूर नुकतेच उमटू लागल्याची चिन्हे या काही पानांतून दिसू लागले आहेत हेच या संग्रहाचे यश.

आपल्या अनुभवांशी नुसते इमान ठेवून अनुभवाच्या गाभ्याला स्पर्श होतोच असे नाही. कामगारातला माणूस हा फार मोठा लांबचा प्रवास आहे. या प्रवासाचे उत्तरदायित्व घेऊ पाहणाऱ्याला अधिक हिंमतीने, डोळसपणे अनुभवांचा अर्थ लावण्याचे पत्करावे लागणार आहे. कृष्णा पाटील यांच्या या कवितेतील प्रवासाची दिशा किमान एवढे सूचित करते हे तूर्तास त्यांचे यश. पण इथे थांबून भागणार नाही. अजून वाटचाल करायची आहे. त्याच्या आशादायक खुणा दाखवणारा हा संग्रह त्यांच्याविषयी विशेष उत्सुकता निर्माण करणारा आहे. सुदैवाने कुठल्याही परंपरेशी नाते बळेच जोडून न घेणाऱ्याला स्वतःच्या शब्दाला अधिक चैतन्यमय करण्याची कित्येकदा संधी असते. ती संधी श्री. पाटील यांना लाभली आहे. आपल्या शब्दांना आपला अनुभव जोडून देण्याचे, इतःपर महत्त्वाचे जिवंतपण कवितेला लाभू देण्याचे बळ त्यांना भविष्यात लाभावे अशीच एक स्नेही म्हणून माझी सद्भावना त्यांच्याबाबतीत राहील.

**– वा. रा. सोनार**

# वाक्झरेस

वाक्झरा झुळझुळ
वहा मन्मनांतून
निर्मल गे काव्यगंगा
कधी तरी तुझ्यातून–

का थांबलीस वहा पुढे
भिते टिका खडकांना
काढ मार्ग नवा नवा
स्वीकारुनी वळणांना–

अव्याहत वहा सदा
दे तोंड विरोधाला
काम सदा तुझे असे
रंजविणे रसिकांना

' कल्पना ' पठारातुनी
तुडवित शब्दकडे
नवरस दरीतूनी
जा अर्थ मैदानाकडे–

खळ्याळसा शद्ध जरी
टाकी बांध मधे तुला
दे धडक प्रकटनाची
ने ! तोडुनी बांधाला–

अलंकार सुरस ते
घेवोनिया तु गे उरी
रंग, नाद, गंधासह
हो लीन काव्यसागरी.

# बाहुली

बया माझी सान
दिसे कशी छान

गोरीगोरीपान
भुवया कमान

इवलेसे कान
डोई वाढे रान

ऐटदार मान
पुनवेचा ' चान '

दीड वाढे रान
गेले त्याचे ध्यान

काळा दोरा आन
अंगावरी वाण

बामणाला दान
विसरली भान

गाते गोड गानं
बया माझी ' जान '

# गूढ

स्तब्ध निशेच्या मौनात
तुझे संगीत स्रवते

घन तिमिरामधूनी
तुझे स्मित झळकते–

शिशिराच्या गारठ्यात
तुझी ऊब जाणवते

आणि निश्चल मेघांत
तुझे पाऊल वाजते–

गाढ झोपल्या सागरी
तुझी जाग जाणवते

समाधिस्थ गिरीतुनी
तुझी वाणी ऐकू येते–

शांत अशा या सृष्टीत
तुझी चाहूल लागते

आतं निःशब्द वाणीत
तुझे गूढ उकलते–

# अभेद

कुणी चित्र काढुनी घेती
कुणी फोटो काढुनी घेती
मला वाटते– छबी तुझी,
हृदयपटली काढुनी घ्यावी–

कुणी ध्यातो गोट्यालाही
कुणी ध्यातो मूर्तीलाही
मला वाटते– मूर्ती तुझी
हृदयांतची कोरुन घ्यावी–

कुणी करतो भजन तेही
फुले अर्पुनी पूजन तेही
मला वाटते– पूजा तुझी,
तन-मन अर्पुनी करुन घ्यावी–

कुणी मग्न प्रेयसीपायी
कुणी मग्न पैशाठायी
मला वाटते– सदा कदा,
मग्न रहावे तुझ्या ठायी–

कोणी तुला ‘ प्रियकर ’ वदती
कोणी ‘ आई ’ संबोधिती
मला वाटते– भेदचि नाही,
मीहि तूच नि तूच मीहि–

# खोडकर बाला

खोड्या करते वर्गामध्ये, सदासर्वदा छान
कुठे आहे नि कशी आहे ती नसते तिजला भान

कधी हलक्या स्वरात गाते, सिनेमाचं गान
कधी ओरडे मैत्रिणीला वही इकडे आण

कधी बसते मेजावरती, होवोनीया आडवी
वेण्या ओढी, चिमटे काढी, रिबन पहा सोडवी

बाक सारा भरवि शाईचा, न ठेवी सुका
नि पदराला हाती धरोनी, तोंड घेई मुका

कधी सोडोनी अपुली जागा, मित्राशेजारी
तास चालता बसण्या जाते, मारून भरारी

कधी वाटते सहाध्याया, नको हो ही ब्याद
देते शिक्षिका सदा टोमणे, रहाया त्यांना याद

खोड्या करता ध्यानी येता, प्राध्यापिका हांकारी
तोऱ्यानं ती उभी रहाते, मेजाच्या माझारी

रागावते बाईहि पाहे, करूनीया वर मान
लाजणे ना कधी मुरडणे, ना ठावे अपमान

सदा नि कदा वर्गी असता, करोनी असले काही
भुषवित राही नाव आपुलं "खोडकर बाला" ही

# माझ्या गावाच्या शेजारी

माझ्या गावाच्या शेजारी
तापी तीर वाहे शांत
शेती सुपीक गाळाची
माप धान्य कणगीत–

माझ्या गावाच्या शेजारी
वस्ती एक टुमदार
दर मंगळवाराला
तिथे भरतो बाजार–

माझ्या गावाच्या शेजारी
महादेवाचे देऊळ
रामेश्वरी झाला आहे
तापी-गीरणेचा मेळ–

माझ्या गावाच्या शेजारी
'पूल' नदीवर मोठा
रम्य शोभा वाहनांची
सौंदर्याला नसे तोटा–

माझ्या गावाच्या शेजारी
गिरी थोर सातपुडा
पाठीराखा तो आमुचा
काय आम्हा तुटवडा– !

# दैव

हेही खरे,
तेही खरे,
खरे आहे सर्वांचे
केवळ खेळ दैवाचे

आशा आहे,
आकांक्षा आहे,
प्रयत्न आशा-स्फूर्तिचे
केवळ खेळ दैवाचे

कष्ट आहे,
आराम आहे,
निमित्त सारे जगण्याचे
केवळ खेळ दैवाचे

दुःख आहे,
सुख आहे,
नाटक सारे जीवनाचे
केवळ खेळ दैवाचे

पैसा आहे.
शक्ति आहे
साधन यशप्राप्तीचे
केवळ मनःशांतीचे

शक्ती, यत्न
पैसा, आशा
साधन अपयश प्राप्तीचे
सहाय्य नसता दैवाचे

# निवेदन

अता सुखाने प्राशन करितो,
प्रेम–हलाहल तुझे प्रियवरा
विरह-सुधेने जीवित आम्ही,
मरण-हेतू जगण्यात खरा–

प्रेमतृष्णाकुल चित्त सदा हे,
दौड दौडुनि झाले श्रान्त
आशामृगजळ सरितेमध्ये
डुंब-डुंबुनी झाले श्रान्त–

माझ्या मरूमय जीवनातल्या,
हे चिर अमृत श्रोता
दे ! दर्शन मज तव अश्रुंनी,
आणि करी अभिषिक्त अता–

ना भी ! जरी उपहास ऐकिसी,
माझ्या क्रुद्ध मुखामधूनी–
मूक करी या मुखास चुंबन
केवळ तुझिये एक धनी–

काम-क्रोधाच्या धुंदीतूनी
ईशभक्ती प्रांगणाकडे
ने ने मला देवा आता
तू मुक्तीच्या गावाकडे–

का गुरफटशी लोभाशी
की जे आवडे तुजलाही
जीवन जगणे रे मला
भाव भावना मजलाहि–

मिळवू देना पुण्य थोडे
का टाकिशी अडथळे
का घेशी परीक्षा माझी
की मजला जी न कळे–

भवताप आव्यामाजी
भाजून मज काढ तू
ठेवी इहलोकी विकाया
बा ! विक्रेता सज्ञान तू–

फुटक्या या मडक्याने
जगी भरू दे की पाणी
शमवू दे तृष्णा त्यांची
जे रडती केविलवाणी–

# माझं खेडं

माझ्या लहान खेड्यात–
लोक ' कुणबी ' रहाती
राबराबती दिवसा
राती आनंदाने गाती–

माझ्या लहान खेड्यात–
नसे कॉंक्रीटची चाळ
रहावया माती–घरं
वसे विजेचंहि जाळं–

माझ्या लहान खेड्यात
पाणी वाहे नालीतून
रस्ते इथे छोटे छोटे
नसे राईभर घाण–

माझ्या लहान खेड्यात
आहे भजनींचा मेळा
घ्याया नाम ते देवाचं
राती होती सर्व गोळा–

माझ्या लहान खेड्यात
लोक रहाती ते भोळे
खाती तिखट–भाकरी
परि शक्तीनं आगळे–

माझ्या लहान खेड्यांत
नाही रोगराई थारा
झुळ-झुळ वाहे सदा
गोड पश्चिमेचा वारा

# मी एक कामगार आहे

मी एक कामगार आहे
मी साधा कामगार आहे

आठ तास राबतो आहे
मेहनताना घेतो आहे

' एलो-मिलो ' खातो आहे
परिवार वाढतो आहे

घर अपुरं पडतं आहे
राबतो आहे, राबतो आहे

श्रमिकांच्या पांडुरंगा !
तुझी वस्ती कुठे आहे ?

प्रयत्नांती फळ माझं
कुठे आहे ? कुठे आहे ?

अर्धपोटी, नग्नहाटी
जगतो आहे, जगतो आहे

जीवनाच्या वाटेवर–
आशेच्या खाटेवर

आकांक्षेच्या फेऱ्यांत
तडफडतो आहे

फडफडतो आहे
भडभडतो आहे

कारण–

मी एक कामगार आहे,
मी साधा कामगार आहे.

## काळ्या पंढरीचा विठू

भक्त तुझे जन जात
इथे मराठी भागात
पंढरीचा विठोबा तू
कामकऱ्यांच्या मनांत–

श्रमिकांचा तूच हरी
राबे उभा बांधावरी
आषाढी व कार्तिकीला
जाशी पाव्हना पंढरी–

लावूनीया आभरणे
रंगी पताका तोरणे
गरजती बडवे ते
'बघा विठ्या, पळा ह्मणे'–

काळया शेती राबूनीया
उन्हे सदा तापूनीया
युगे खपता शेतात
सावळी रे झाली काया––

तूची नांगरतो धनी
वेची कपाशी रुक्मिणी
कसा येऊ मी पंढरी
"भागा" वाहे नालीतुनी–

# हाक

कधी हांक मी घालावी
भवाच्या या सागरात
तडफावे तुझ्यासाठी
पार जाया दिन रात–

कधी हांक मी घालावी
मनोदरी काळोखात
अनाडी ऱ्या ज्ञानराजा
स्थान द्याया हृदयात–

कधी हांक मी घालावी
समजोनी तुवा आई
खेळ सारा खेळविते
राहोनीया माझे ठायी–

कधी हांक मी घालावी
भक्तसख्या तुला देवा
थकलेल्या माझ्या मना
द्याया शेवटी विसावा–

# कामगाराचा संसार

माझ्या लहान संसारी
काही एक नसे कमी
दर एक पगाराला
कमी करी उणीवा मी–

माझ्या लहान संसारी
रांजण तो एका कोनी
नाही स्टीलची ती भांडी
मडक्यांच्या उतरणी–

माझ्या लहान संसारी
नसे गृहिणी सवड
सजविण्या संसार ती
अर्पे तन-धन-बळ–

माझ्या लहान संसारी
दिसे ईश्वराचे रूप
नसे इतुकीशी घाण
सदा वसे टापटीप–

माझ्या लहान संसारी
दुःख नसे आम्हा थोडं
बाळ करी ' वटवट '
असा जातो माझा काळ–

# माझा जळगाव जिल्हा

जळगाव जिल्ह्यात या
माता तापी वाहे शांत
थोर हिच्या पुण्याइनं
पिक डोले शिवारात—

जळगाव जिल्ह्यात या
वीर किती झाले शूर
बाल शिरे त्यागूनीया
पळविले 'गोरे' दूर—

जळगाव जिल्ह्यात या
पंथ वारकरी भोळा
गाया अभंग तुक्याचे
राती होती सर्व गोळा—

जळगाव जिल्ह्यात या
बोली चाले अहिराणी
गोड गोडवा तियेचा
जिंके अमृताची वाणी—

जळगाव जिल्ह्यात या
शूर-भिल्ल, कोळी जाती
ग्राम रक्षाया लढती
घेवूनीया शिर हाती—

जळगाव जिल्ह्यात या
भाषा चालते मराठी
इथं जेवते शारदा
सदा सोन्याचिया ताटी—

जळगाव जिल्ह्यात या
कलेची हो लयलूट
फेडी डोळ्यांचे पारणे
रम्य अंजिठ्याचा थाट–

जळगाव जिल्ह्यात या
निसर्गाची कृपा भारी
संतोषवी प्रवाशांना
जांभूळ नि, केळी बोरी–

जळगाव जिल्ह्यात या
गिरी थोर सातपुडा
पाठिराखा उत्तरेला
काय आम्हा तुटवडा !–

जळगाव जिल्ह्यात या
विविधता, धूप-छाया
देवा देरे सारं काही
'कल्पनेला' रिझवाया–

## कामगाराची संपत्ती

जरी पैसा मला नाही
असे शरीर संपत्ती
शह देई दारिद्र्याला
पुरविते गरजा ती–

बसे संपूर्ण आरोग्य
राबणारे दोन हात
घमेंडीने काढी पाणी
मारी जिथे मी रे ! लाथ

जरी नसे उंची माडी
असे लहान झोपडी
पुरी होते रहावया
बाकी जागा उरे थोडी–

आहे एक नोकरीही
गिरणीत रातपाळी
साच्यावर राबूनिया
निर्मी संसारात गोडी–

माझ्या छोट्या परसात
भाजीपाला पिकवी मी
लावी झेंडू, जाई, जुई
सौंदर्याला काय कमी ?–

सुखं देती मुलं नातू
असे 'लक्ष्मी' गृहिणी
नसे धन माझ्या ठायी
लोक धन्य मज मानी–

## मातेप्रत

कोण उठवी सांग ना ?
म्हणुनीया माझी 'सोनी'
देईल गे नहायाला
सकाळीस ऊन पाणी— !

पुसूनिया माझं अंग
कोण करी तेल-फणी
घालिल गे शिरी माझ्या
नाजुकशी फूलवेणी— !

कोण सजवील मज
शाळेमध्ये पाठवाया
दृष्ट काढेल गे कोण
बाया नाही चांगल्या या—

कोण देईल मजला
गोड खाऊ रोज खाया
भरवील मिष्ट अन्न
पाटावरी बसवुनिया—!

मज उशीर होईल
शाळेतूनी घरी याया
पाहील ग कोण वाट
ओट्यावरी बैसुनिया—

कोण शिकवील मज
गोड भावगीते गाया
ताल धरुनी नाचाया
जन्म जाईल का वाया—

निजवील कोण मज
गाऊनीया गोड गाणी
कोण सांगेल मज ती
राजा-राणीची कहाणी–

निघुनीया तू का गेली
परतुनी नाही आली
रहायाची इच्छा ‘ माय ’
पूरी नाही का ग झाली–

# ' लेक नांदतीच बरी '

जा ग मुली सासरला
पहा उभी दारी गाडी
' राम ' आला घ्यावयाला
चल नेस नवी साडी—

काय हवं काय सांग
मनी काही ठेवू नको
लपूनिया तुझ्या संगं
दुज्या घरी नेवू नको—

कमी नाही तुला काही
पृथ्वीमोल तुझा हरी
सासरला सुखे नांदा
तुझे हित रीत खरी—

जा ग आक्का पाहू नको
वळू नको टिपे गाळू
नसे काही इथे बाई
नको मोहाला तू भाळू—

हुरहुर का ग मनी
हो तू ' सीता सायतोरी '
आजी सांगोनी गेली ग
' लेक नांदतीच बरी ! '

# धाव !

धाव देवा धाव !
भक्ताला तू पाव
अडकली नौका माझी
पैलतीरी लाव–

अखंड संसारी
माजली बेकारी
सुख नाही भोगत मी
स्वार्थांच्या बाजारी–

फसलो मायेत
या मृगजळात
भास होई पाणीयाचा
राहिलो तृषार्त–

जीवाची मासळी
कामाची सुसरी
गिळू पाहे भवात या
दुःख हे निवारी–

येवून तू दारी
भवताप हारी
बुडतसे मुक्त करी
धाव रे ! मुरारी !

# ओढ

ये ! ये ! भाऊराया
दिवाळीला न्याया
पातळली माया
अशी तू का ?

नको लेवू लेणं
प्रेमाचं बोलणं
माझं हे मागणं
धन नाही–

ओढ ही लागली
भेटेल माऊली
कृपेची साऊली
मला केव्हा ?

वाट मी पाहिली
मती आसावली
गाडी नाही आली
अजूनीया–

का रे ! कंटाळला
अपुल्या ' माई 'ला
ये ना न्यावयाला
गाडीवरी–

# अन्याय

गीते गाऊनी जना रिझवी
रूप दे काळे कोकिळा
कपटे गटकन् गिळे मासळी
रूप धवल दे बगळा-

रूप, गंध जगा पुरविण्या
निर्मे कमळा चिखलामाजी
सौरभ-सौष्ठव जयास नाही
सदाफुली ताटवी विराजी-

जग कल्याणी मृदू कोळसा
अग्नीमाजी भस्म करी
कुचकामी कठोर हिरा तो
जाऊन बसवी नृपाशिरी-

सुंदर-पंडित कुणा करोनी
भीक मागवी मार्गावरती
कुरूप-मूर्खा कधी कधी तू
नेऊनी बसवी तक्तावरती-

## खरं नातं– !

भाऊ आहे,
बहीण आहे,
केवळ नातं रक्ताचं
नसे एकहि कामाचं–
मित्र आहे,
मैत्रिण आहे,
केवळ नातं मोहाचं
असे विकारी हृदयाचं–
स्थावर आहे,
जंगम आहे,
केवळ नातं ' मायेचं '
क्षणिक ढगाच्या छायेचं -
सौन्दर्य आहे,
दौलत आहे,
केवळ नातं लोभाचं
इंद्रधनूच्या रंगाचं–
खरं आहे,
खोटं आहे,
केवळ नातं बुद्धीचं
मनोदरीच्या भासाचं–
' कृष्ण ' आहे,
' मिरा ' आहे,
नाते प्रेमी द्वैताचं
जन्मोजन्मी मिलनाचं–

## धबधब्यास

थांब न घे उड्या निर्झरबाळा
बा चिर तरुणीच्या तू लडिवाळा
धवल फेसाळ स्वच्छंद जळा
का करिसी रे तू खट्याळ चाळा–

रे! थांब! जातोस कुठे लबाडा
बघ की खालती खोल कराडा
मृत्यूसामोरी उघडूनी जबडा
अर्पूनी तन का जाशी पाताळा–

बांधूनी पायाशी घुंगुरवाळा
का धरा नाचवी तुजला बाळा
बघ की, खालती पाषाण काळा
होशील रे सोक्षमोक्ष कपाळा–

पाणी हे पिंजल्या कापसापरी
ऐकवी गोड शब्द वरीवरी
लक्ष वेधिशी बघ्यांचे जरी
खेद मनी की पडशी कपारी–

का स्वत्त्व नष्ट करवूनी घेशी?
की जग कल्याणा देह अर्पिशी
देवो युगान्त आयुष्य तुजशी
करितो विनंति कवी प्रभुशी–

# माणूस मीहि !

खोटे कधी बोलत नाही
खरे कधी सांगत नाही
बोलण्याची वाईट खोड
मेल्याविना जाणार नाही !

चोरी कधी करीत नाही
खिसे कधी कापित नाही
कधी करीतो पोटासाठी
त्याला चोरी म्हणत नाही !

सट्टा कधी खेळत नाही
रेस, जुगार नको काही
लावतो कधी छका पंजा
कधी लागतो कधी नाही !

विड्या कधी ओढीत नाही
सिनेमाला जातच नाही
विकतो वस्तू घरांतून
गेल्याविना राहत नाही !

षोक सर्व करीत नाही
करतो असे काही काही
करतो मौज खातो पितो
म्हणून म्हणतो माणूस मीहि

# कामगार-मित्र

खेडेगावी जन्मा आला कामगार-मित्र
साने गुरुजींचे लाभले अटळ कृपाछत्र
मजुरांच्या कल्याणास्तव जन्म येथ घेई
गमे श्रमिका मित्राहूनी पाठिचाच भाई-

सानसानुला गोजिरवाणा असा होता बाळ
गुरुजींच्या आशिर्वचाने हो प्रशासन काळ
मजुर-कैवारी मारी ललकारी राज्यीं दूरवर
आवाजाला धार तयाच्या उठती सानथोर-

खात्यातून दररोज हा उत्साहे जाई
मजूर-हृदी अत्यानंदाचे भरतेच येई
यासी पहाता सूटे कंप कामगार शत्रूला
बंधुत्वाचे नाते याचे मजुर जगताला-

कामगार कल्याणास्तव हा झटतो धैर्यानं
कटु सत्याची वाणी याची धडाडीचं जीणं
फोडूनी काढी तट रिपूचा भाषाभेद करूनी
पापालाही फोडी वाचा याची हितकरणी-

मजूर-वाली दे सहारा गिरणी कामगारा
छत्राखाली यांच्या सहती वर्षा नि गारा
गाऱ्हाणे त्यांचे मांडितो प्रशासनापुढती
साध्य मिळविण्या झटे निशिदिनि कष्ट पडोत किती-

दाद मागतो कामगारांची संघटनेकरवी
सुखी पहाण्या श्रमिक जनता झटतो ध्येयरवि
शांती-लढ्याचे हत्यार घेवूनी पुरवी काम सारे
वाहवितो श्रमिकांसाठी सदा प्रगती वारे-

जुन्या, विचारा मागे टाकतो भेदा नच थारा
स्वभाव असला या मित्राचा जगाहूनी न्यारा
किर्ती किती गाऊ भाऊची करितो कार्य थोर
कार्य आमुच्या दीनबंधूचे जगाहूनी न्यारं

कामगार मित्रा ! तू राही दास मजूरांचा
भवानीचा हस्त राहू दे तव शिरी प्रेमाचा
जनतेला जरी दिसतो आज दैव दिलगीर
भविष्यकाळी, महाराष्ट्री तू बनशील धीर वीर-

## शेतकरी

शुक्राच्या उदयी
उठे घाई घाई
गोठ्याकडे धाई
शेतकरी–

धार पवळीची
काढी सव्यसाची
तृष्णा वासरांची
शांत करी–

विळा-दोर घेई
शेतावर जाई
घेवोनिया येई
गवत ते–

खिलारी–ठेलारी
जोडूनी नांगरी
जाई शेतावरी
प्रातःकाळी–

कडक दुपारी
घेवूनी भाकरी
श्रम परिहारी
मालकीण–

पिके असे सोनं
आँदा मालकिण
सोन्यानं मढीन
यंदा साली–

गाते मालकीण
हरपतो भान
नसे दुजे कोण
शेतावरी–

# विकास

तुझ्या विवाहाने
मूकप्रीतीचा विलास थांबला
सौ.च्या नियमनाने
संसाराचा विकास थांबला
जळालेले पापळ काळीज
विरहाच्या ओंजळी
तीळ तीळ कुटून मन
थेंब थेंब तेल
काढीत आहे, जाळीत आहे
भकास जीवनात
विकास आणण्यात
प्रतिभेची लहान पणती
काळाची करीत गणती
योजनांच्या वातीने
विरहाच्या स्मृतीने
तेवू पहात आहे, येवू पहात आ
नकोस करू मोठी
काजळी सारून अबोलाची
तेवू दे राहू दे
आत्म्याच्या विकासासाठी
मूकच प्रीती !

## जीवनाची गाडी

जीवनाची गाडी
बेफाम धावते
ध्येयाच्या जंक्शनकडे
आशा-आकांक्षांचे रूळ
कधी न भेटतात एक दुसऱ्याला
'टर्मिनेशन' नाहीच नाही!
वेड्या महत्त्वाकांक्षेने प्रेरीत मी
फिरण्याचे नाही घेत नाव
मनाचे इंजिन सतत धावते
भावना–वासनांचे इंधन
कल्पनांचं पडतं तेल
तूच असते आत प्रवाशी
विनातिकिट एकलकोंडी
नातेवाईक टाके धाड
तिकिटाचे पैसे काढ
दुःखाची ओढून साखळी
तू वदते माझीच गाडी
प्रयत्नाच्या कुचक्या पुलाची
संकटात लागता चाहूल
तूच झाली माहूल
मोहाचा सोडून ब्रेक
मायेचं दाखवून निशाण
थांबविली आपली गाडी
वाचविली मोडातोडी
धोक्याच्या सावटातून
'गार्ड' होवून...

## व्यथा

संसार सफरीतल्या सच्च्या सोबत्या,
दिलाच्या दिलवरा–जीवाच्या जोडीदारा !
दुर्दैव दर्यांत,
प्रेमतारू तरणे कठीण आहे, !
आयुष्य दगडाला असते,
फुलाला नसते ! !
फुलांचा वास बघायचा, कुंडी बघायची नसते !
' कृष्ण ' माफ करा
माझ्या रानफुलांचा रंग भडक आहे
पण–
वास मधुर आहे–
आपल्या चरणी वाहिले आहे,
पूजा तरी गोड करून घ्या
तोंड रांगडे राक्षसगण आहे
मन मात्र देवगणाचे आहे
परिसाच्या स्पर्शाने लोखंडाचे सोने होईल
जीवांत जीवपण नाही
देहांत देहपण नाही
नुसते ' कल्पना ' नाव उरले ! !

# माझ्या भारत देशात

: १ :

माझ्या भारत देशात
कवि वाल्मिकि नि व्यास
गोड महाकाव्य दिले
जगा वाटे हेवा खास-

माझ्या भारत देशात
रामराजा जनओढ
उच्च राजनीति त्याची
जगी ज्याला नाही तोड-

माझ्या भारत देशात
मान ' कृष्ण ' सारथ्याला
' गीता ' सांगे अर्जुनाशी
नवतत्त्वे जगताला-

माझ्या भारत देशात
स्थान भक्त प्रल्हादाला
ज्याच्या प्रखर भक्तीने
देव स्तंभी प्रकटला-

माझ्या भारत देशात
स्वामिभक्त बाजीप्रभू
पावनखिंडी कामावुनी
रक्षियला निजप्रभू-

माझ्या भारत देशात
वीर शिवबा जाहला
धर्मप्रलयासमयी
देश ' मराठा ' रक्षिला-

माझ्या भारत देशात
स्वाभिमानी लोकमान्य
स्वराज्याचा मंत्र दिला
भारतीया केले धन्य–

माझ्या भारत देशात
गांधी झाले सत्यवादी
अंगी अहिंसा लेवुनी
विनाशस्त्र घे आझादी–

माझ्या भारत देशात
'शांतीदूत' शास्त्री, नेहरू
संग्रामाच्या वादळात
तारियले हिंद-तारू–

माझ्या भारत देशात
थोर विभूतींची काया
विसरे मी किती तरी
शब्द अपुरे ते गाया–

: २ :

माझ्या भारत देशात
सीतासती शिरोमणी
करी त्याग ती राज्याचा
वनी निघे अनवाणी–

माझ्या भारत देशात
सती थोर अनुसया
केली बाळे तिन्ही देवा
अशी तिची थोर माया–

माझ्या भारत देशात
सवी सावित्रीहि झाली
प्राण मागाया पतीचे
यमामागे स्वर्गी गेली–

माझ्या भारत देशात
स्थान चांगुणाआईला
टाकी बाळ भोजनात
फिरवे ना अतिथीला–

माझ्या भारत देशात
कृष्णाकुमारी–पद्मिनी
लाज रक्षाया कुलाची
अग्नी उडी घेई क्षणी–

माझ्या भारत देशात
एक माता जिजा झाली
देश रक्षाया 'मराठा'
आज्ञा बालकाला दिली–

माझ्या भारत देशात
संत मीराबाई झाली
गाढ भक्ती कृष्णावरी
पेल विषाचाहि प्याली–

माझ्या भारत देशात
'लक्ष्मी' वीरांगना झाली
घेता स्वातंत्र्य देशाचं
रणी अमर जहाली–

माझ्या भारत देशात
झाली कस्तुरबा देवी
करूनिया लोकसेवा
लोकां दिली दृष्टी नवी–

## माझी शाळा

माझ्या मराठी शाळेत
मुलं शिकती लहान
सदा राहती ते स्वच्छ
भोळ्या निर्मळ मनानं-

माझ्या मराठी शाळेत
बाई गोष्टी सांगे छान
मोठा उपदेश असे
जरी असती लहान-

माझ्या मराठी शाळेत
आम्ही काही धडे घेवू
'करा प्रेम' जगावरी
व्हा रे ! तुम्ही भाऊ भाऊ-

माझ्या मराठी शाळेत
मिळे ज्ञान पहा हेही
द्या रे सुख आईबापा
देश धर्म राखा तोही-

माझ्या मराठी शाळेत
शिकती बालके सारी
भावी काल देशभक्त
जाती यातुनिया वरी-

# रुष्ट बदली कामगारास

नाही बदली आज जरी
का खिन्न होशी मनान्तरी
दुबळी नाही तुझीच गिरणी
'आजार' येती घरोघरी–

ये कधी सुखाचा भोवरा
हो कधी दुःखाचा खरारा
'बोनस' पूर जीवनगंगी
टाळेबंदी ऊन वारा–

कधी आड कापसाची
कधी कमी इंधनाची
कधी कधी उधानाला
माल मागणी मंदीची–

कधी भरती नव्यांची
कधी छाटणी जुन्यांची
चालू राहे गिरणी ही
हीच खूण सौभाग्याची–

सोड खिन्नता तू सारी
संघशक्ति असे भारी
तुझा नेता संगतीला
रहा सुखे कामावरी–

# व्यर्थ !

मी-
रोजरोज-
वृत्तपत्रांत-
जाहिरात वाचतो-
' अनुभवी चाकर पाहिजे '
अर्ज करीतो-
( जिल्हा सेवा योजनेमार्फत )
प्रयत्नांची पराकाष्ठा होते
विद्येची चेष्टा होते
पण...
अनुभव नसल्याने,
( वशिला लहान असल्याने )
प्रयत्न व्यर्थ ठरतो-
वशिला अर्थ नेतो-
( मी विनानुभवीच रहातो )
पुन्हा अर्ज करण्यासाठी-
फुकट्या ! पेपर वाचण्यासाठीच
व्यर्थ ! !

# शिकवण

शिकविते आई मज
न जे ठावे इतराला
'करी प्रेम तू जगाशी
ठेव गोडी तू वाणीला'

शिकविती वडील जे
नसे उपमा तयाला
'करी सतत अभ्यास
हृदी जागव ध्येयाला'-

शिकविती गुरुजन
सेवा देशाची हो करा!
'करू नका चोरी कधी
संग सज्जनांचा धरा'

शिकवणीचा या मेळ
तीन विभूतींचा करू
करू वंदन तयांना
माता, पिता आणि गुरू

## सासरला जा !

नुरे भरी कशी आग
रावासारखी ना वाग
मूर्खांपरी फिरू नको
नीट संसाराला लाग–

नाव तुझं ‘ प्रेमलता ’
मनी रहा पतिव्रता
वागू नको असे तसे
खाशी केव्हा तरी गोता–

काय नाव द्यावे याला
का कंटाळे संसाराला
करी विचार नीटसा
असं काही होई तुला ?

होई ‘ भलेबुरे ’ काही
रडशील धाई धाई
विचारशी ‘ आका ’, ‘ माभी ’
‘ आता कसं करू बाई ?’

पती पत्नीला देवता
दुःख साही गाता गाता
पतिविना नाही लाता
सासरला जा तू आता–

## कलियुग

खोटे बोलणाऱ्याला इथे मिळे मान
खरे बोलणाऱ्याचा सदा अपमान–

एकपत्नी रामाच्या हो सुखाची होळी
बलात्कारी रावण ओढे आनंदे गुडगुडी–

चोरी करणारा सदा पोटभर खाई
इमानदाराचे इथं पाठी पोट जाई–

अरे वा ! कलियुगा तुझी वेगळी माया
का अन्याया ह्या देव म्हणे दुनिया–

## कामगाराचा साधी कार्यक्रम

गणधीश महाराज तुमचे गायन सुरंग
गोड गर्जना नृत्य थयथया तोंडि सहा राग
गती जाणणे, गोड बोलणे हाच वसे भोग
गर्क जनताजनार्दन ऐकून पंचम सारंग
गगनधरावर तुमच्या नावे प्रथम रागरंग
गमण्या साध्य, चालती वाद्य पखवाज मृदंग
गण निर्गुणा जगापलीकडे अखंड अभंग
गवसेना कुणा चराचरी असुनी निःसंग
गळयात माळा, पायी घुंगुर वाट पाहे जग
गणपती घ्या श्रमिकांसाठी सगुणाचा जोग
गंध पुष्प धूप ध्यायी कवित्वा ठेवूनी मन चांग
गड्या ' कामगाराच्या कविता 'चा साधी कार्यभाग

## जर असते हाड जिभेला–

खिशाचा सल्ला नसता घेतला
नेहमीच्या तिच्या वळवळीला
अवेळी, अकारण, शहाणपणाला
फाटा देता येतो मानवाला
केव्हा मुकतो तो दंतपंक्तिला
केव्हा सोडूनी जातो कुडीला
'बोन फ्रॅक्चर' करून तिचे
प्रसंग असता टाळता आला।
जर असते हाड जिभेला–

## चावटिका

एक होता नोकर
जाई रोज कामावर
लागे त्याला ठोकर
झाला तो 'जोकर'
लोक त्याला बघत
सदाकदा हसत
नोकरीवर रुसला
बेकार होवून बसला–

## भटजी

आवक
२१३५२
दि. २२८९

भानूच्या उदयी
ऊठे घाई घाई
गंगेवर जाई
भटजी तो–

पाणी आणी घरी
स्नान-संध्या करी
टाकी देवदारी
बेलपत्रे–

पंचा खांद्यावरी
झोळी लावे करी
मुखे वदे हरी
चालतसे–

एकादशी खरी
करा दर वारी
आलो असे दारी
धान्य घ्याया–

धान्य टाका थोडं
माझे कर्म गोड
नाही याला जोड
मागणं हे–

गावात फिरूनी
घराशी जावूनी
नि देई तो गृहिणी
'धान्य' तेची–

दळण ती करी
देई गिरणीवरी
स्वैपाकहि करी
मोले अन्न-

हात फिरवूनी
तूप-रोटी खाई
झोपोनिया जाई
शांत मग-

-असा क्रम त्याचा
वाडवडिलांचा
किती दिवसांचा
युग झाले-

पेशवाई गेली
लोकशाही आली
नाही पालटली
रीत त्याची-

# कामगार-शिक्षण योजना

विशिष्ट मनिच्या ध्येयपूर्तिच्या, घेवोनी मनि कल्पना
त्रि-पक्षियांनी जन्मा घातली, श्रम-शिक्षण योजना-

राष्ट्रीय एकात्मता निर्माया, ध्येय हिचे न्यारे
व्हावेत पुढती सुज्ञ-शहाणे श्रमिक देशी सारे-

वसली देशी खेडो-पाडी, श्रमिक वस्ती सारी
अज्ञानाने तया ग्रासिले, जीवन जगणे भारी

योजनांची वसे सफलता, कामगारांवरती
पाया आहे तो प्रगतिचा, भविष्य कळसावरती

सूचल कराया, स्वदेशी या, चिर प्रगतीचा मार्ग
योजनेने सुरु ठाकले, श्रमिक-शिक्षा वर्ग-

बदल कराया रहाणी, या या औद्योगिक शांती
ध्येय आखले घडवायाची, वैचारिक क्रांती-

द्याया स्थान अर्थव्यवस्थी, देशी-श्रमिकाला
येण्या नीती, जाणीव स्वये, कुशल काम त्याला-

पाठिंबाया आज देशाला प्रगतीच्या काळी
सज्ज उभारण्या कामगारांच्या वाडी नि चाळी

वाहतील मग देशाठायी, सुखशांतीचे वारे
शमतील मालक-मजूरांठायी, कटुता पृष्ठ निखारे-

हजारोंनी देशी चालती 'कामगार-वर्ग'
श्रमिकांच्या जीवनासाठी जणू नवा स्वर्ग-

आजवरीच्या प्रगतीच्या, आकडेवारीखाली
रंजलेल्या दश लक्षांची, प्रशिक्षिती झाली-

शिक्षणाधिकारी-श्रमीक, शिक्षक, कामगारपायी
लि-पठारी टाकूनी वळणे, ‘ ज्ञानगंगा ’ वाही–

प्रत्येक वर्षी नव्या योजने मिळते अनुदान
प्राथमिक नि ऐच्छिक योजना फोफावे ऐटीन–

श्रमिकांनो ! घ्यारे शिक्षण ठेवुनी मनी ‘ कल्पना ’
जागृत विचारी सफल कराया, हातातील योजना–

शिक्षणांची या चर्चा व्हावी ‘ कृति ’द्वारा छान
भारत-भूला मिळवूनी द्याया जगती बहुमान–

# बरे नव्हे

कारे बाटविशी
पवित्र देहाशी
मांस, मच्छी खाशी
बरं नव्हे–

भजन कीर्तन
संगीत गायन
त्याच्याविना जिणं
बरं नव्हे–

खोटे ते बोलणे
मद्याला शिवणे
परस्त्री भोगणे
बरं नव्हे–

खावया मागणे
परक्या रागणे
निष्क्रिय जगणे
बरं नव्हे–

'पोर' मोठाडणे
'कुंवारी' असणे
घराशी ठेवणे
बरं नव्हे–

चला या रे चला जाऊ
जत्रा मिळूनीया पाहू
मजा करू थोडी राहू
गीत आनंदाचे गाऊ– १

आहे गावाचीच जत्रा
पाळी तुझी आज मित्रा
असा कसा तू रे मित्रा
पैसा खातो काय कुत्रा ?– २

चला हॉटेलात जावू
या रे, या ग बसा पाहू
चला सर्व ' खाऊ खावू '
आलु-वडा-पेढे घेवू – ३

' ल्यारे हाऊ लाकडी घोडा '
पैसे नाही तुटवडा
चला पळा लवकरी
रात्र होई पळा पळा – ४

फुगेवाला मधे येई
कोणता ? घ्या ! करा घाई
चालताना ऐकताना
मजा मुलांनाहि येई– ५

बोले ' मौतकुवा ' नाना
धीरे धीरे पुढे या ना
फक्त दहा पैसे द्या ना
' देखो ' मृत्यूशी सामना– ६

ऐकू येई कीर्तनाचा
स्वर कुठे भजनाचा
कुठे वसे ' ब्रह्मसत्र '
आवाज तो गायनाचा- ७

मुलं मग पुढे येती
भेट देवांचीहि घेती
खोबऱ्याच्या प्रसादात
खडीसाखर वाटती- ८

येळ झाली चला आता
काय देव मस्त व्हता ! '
जावू नका जपू चला
' रेतूमान ' येथे आता- ९

एकादशी वैशाखाला
अमळनेरी होई मेळा
भेटी संत सखाराम
खेडूत ते होती गोळा- १०

# ऊठ कामगारा !

ऊठ कामगारा !
टाळ येरझारा
वाहू लागे वारा
नकाराचा–

'मॉग' साकाळली
विरोधानं न्हाली
वेळ पाणावली
शैथिल्याने–

विसरा वहिमा
राम नि रहिमा
करा रे ! त्राहिंमा
प्रशासन

दिवाळीही येई
वाढे महागाई
सजवाया नाही
माया तीची–

संपाचीच भाषा
बोल आता खाशा
करूनिया त्वेषा
मागणीची–

# अनाथ

अनाथ मी तुझा बालक
तू सर्वांचा रक्षक पालक
प्रभु ! सांभाळी मजला आता
तुजविण नाही कोणी त्राता–

भक्तवत्सल माझी आई
टाकुनी गेली रडावयाहि
जनकहि तिच्यामागे गेला
तूच तारशी अज्ञानीला -

टाळ-विणा मी करी धरी
भक्तीभावे भजन करी
चरणी तुझिया वृत्ती बावरी
कृप एवढी करी श्रीहरी–

माया न कळली जी ब्रह्माशी
कळेल कशी मज पामराशी
तूचि मजशी सहाय्य करी
ने ! करी धरोनी पैलतिरी–

ओढ लागली खिन्न अंतरी
भक्तांचा तू सदय मुरारी
बोलवितो तुज ' चक्रधरी '
ये धावुनिया घे कडेवरी–

## चल नांदायला 'येडी'

चल राणी सासरला, न्यावया मी आलो तुला
स्वयंपाकाची चणचण, काय व्यथा सांगू तुला

आणली ग गाडीजोडी, नव्या लुगड्याची घडी
नेस सोलापुरी साडी, चल नांदायला वेडी

वाळली तू इतकी का? दळत का होती घरी!
दिसे कशी तुझी काया, हाले वाऱ्याने बाजरी

सासरला कशी होती, जशी कोवळी काकडी
निसोनिया धान्य इथं, केली कंबर वाकडी

अग पहा ही कारटी, 'किडकावली' वाळली
लक्ष दिलं नसेल तू, बघ किती शेफारली

पाहूनीया इथं सारं, जीव तीळतीळ तुटे
त्वरे तार देती मला, का मी मेलो होतो कुठे?

चल बस गाडीवर, पहा गे तू माझी घडी
चूप चाप चल पुढे, वृथा फिरेल खोपडी

'उगी चूप! रडते का?' मुखे सांग सारं सारं
दोन जीवांचा संसार चित्त नाही अपुलं न्यारं

# काल व आज

काल होते गुरू जे ते
शाळा त्यांच्या घरी होती
आज गुरुजन तेच
शिकविण्या घरी येती

काल शिष्य गुरूघरी
पाणी भरी थंडी वारी
आज शिष्य म्हणे त्याशी
" वेळ नाही मला ' सॉरी ' "

विज्ञानाच्या युगामाजी
श्रद्धा सारी लुप्त झाली
जगी कली आज व्याला
मुके पोटी सेवा न्हाली !

# खरे सौंदर्य लपले

खरे सौंदय लपले
ईश-भक्तित ध्रुवाच्या
भीष्म-प्रतिज्ञेत पहा
पत्नी-व्रतात रामाच्या–

खरे सौंदर्य लपले
गुरूभक्तीत लव्याच्या
'भगीरथ यत्नवादी
ध्येयनिष्ठी प्रल्हादाच्या–

खरे सौंदर्य लपले
अर्जुनाच्या एकाग्रती
न्यायी-जहांगीरी पहा
संभाजीची धर्म-प्रीती–

खरे सौंदर्य लपले
हरिश्चंद्र सत्य-प्रीती
'पितृभक्ती' श्रावणाच्या
'लक्ष्मी'च्या शूरवृत्ती–

खरे सौंदर्य लपले
कर्णाचिया दातृत्वांत
स्वामिनिष्ठेत बाजीच्या
बुद्धाचिया अहिंसेत–

## वेडा

एक वेडा कवी लिही
काव्य सदा तुझ्यासाठी
तूच नाही वाचावया
शब्द जुळे तुझ्यासाठी– १

एक वेडा गीतकार
लिही गीत तुझ्यासाठी
तूच नाही ऐकावया
भाव वेडे तुझ्यासाठी– २

एक वेडा संगीतकार
छेडे तार तुझ्यासाठी
तूच नाही मुग्धावया
सूर झुरे तुझ्यासाठी– ३

एक वेडा चित्रकार
काढी चित्र तुझ्यासाठी
तूच नाही प्रतिमाया
रंग चिंबे तुझ्यासाठी– ४

## काणिका

पूर्वीच्या काळी,
गरिबांना ( खैरात ) देण्यासाठी–
श्रीमंत धान्य ठेवित कोठीत दळून

आत्ताच्या काळी,
गरिबांना ( वाढत्या भावात ) देण्यासाठी–
श्रीमंत धान्य ठेवतात कोठ्यात दडवून.

REFBK-0021372
REFBK-0021372